# कविता

## ***सौमित्र (किशोर कदम)***

कवी, अभिनेता

kiishorkadam@gmail. com

**Sambhāṣaṇ** Volume 1 : Issue 02, June 2020 | **संभाषण** वर्ष ०१: अंक ०२, जून २०२०

## संधिकाल...

रस्ते सगळे मरून पडलेले साप
वाकडे तिकडे लांब आखूड प्रदीर्घ
दोरखंड कापून टाकलेले अस्ताव्यस्त
कुण्या वेड्याने असंबद्ध मारलेल्या रेघा
वारा सोडून गेलेली झाडं भररस्त्यात
पायथ्यांशी पडलेल्या निष्प्राण सावल्या
रांगारागांनी रस्त्यांवर रात्रंदिवस एकाकी
मुलं निघून गेलेली खेळण्यातली वाहनं
शहरं सोडून गावाकडे निघालेले रेल्वेरूळ
त्यावर धावणारे डबे यार्डायार्डात सुन्नं
गर्दी गोंधळ गदारोळ निसटले प्लॅटफॉर्म्स
हजारो पावलांचे आवाज आठवते पूल्स
विझल्या इमारती वितळत्या मेणबत्त्या
रचून ठेवलेले ठोकळे
खालचा पत्ता काढल्यावर कोसळून पडणारे बंगले
अतिरेक्यांची विमानं आदळून पोखरलेले ट्विन टॉवर्स जागच्या जागी खचून जाणारे
गल्ल्या भंगार कचरा डम्पिंग ग्राऊन्ड्ज
आकाशात अंगार ओकत लॉकडाऊन सूर्य
आक्खं शहर मधेच सोडून दिलेला डाव

संभ्रमित कावळ्यांची रस्त्याच्या मधोमध
गोंधळलेली बावरलेली स्तब्ध काव काव
भयाण भेसूर संधिकालीन चाहूल चकवा
आत्महत्येपूर्वीचा खूप मानसिक थकवा ...

## या लॉकडाऊनच्या काळात

दूरपर्यंत पसरल्या टक्कं उन्हातल्या
निर्जन रस्त्यातून एक माणूस
हातात एक जाडजूड पुस्तक घेतलेला
कुणाशी काही घेणंदेणं नसल्यागत
संथपणे चालत जात होता पाठमोरा

मी धावत जाऊन हाक मारून
थांबवलं त्याला
जवळ जाऊन पाहातो तर काय
चक्क बाबासाहेब !

मी म्हटलं
“बाबासाहेब कुठे निघालाय्त
या निर्मनुष्य लॉकडाऊनमध्ये
एवढ्या भर उन्हात ?”

ते काहीच बोल्ले नाहीत
एकटक पाहात राहिले नुस्ते
मग पाठ वळवून चालू लागले सरळ
काहीच अंतरावर नाकेबंदी होती
बॅरिकेट्स होते पोलीस होते

रस्ता अडवून उभे

आता त्यांना अडवतील
आधार कार्ड विचारतील
ड्रायव्हिंग लायसंस निदान
पॅनकार्ड किंवा ओळख काहीतरी
हा विचार मनात येईपर्यंत
ते पोहोचले होते बॅरिकेट्सपर्यंत
मी पाहात होतो
पोलीस त्यांच्याशी बोलत होते
काही विचारत होते पुन्हा पुन्हा
काही वेळाने ते
बाबासाहेबांची झडती घेऊ लागले
खिसे तपासू लागले
बहुदा त्यांना काही सापडलं नसावं

शेवटी त्यांनी त्यांच्या हातातलं
जाडजूड पुस्तक हिसकावून
ते पुस्तक पोलीस चाळू लागले

कितीतरी वेळ ते पुस्तक चाळत होते
एकमेकांशी बोलत होते
फोनवर कुणाला तरी
काही सांगत होते हातवारे करत
बाबासाहेबांकडे पाहात होते पुन्हा
पुन्हा पुस्तक चाळत होते

नाकाबंदी कधी उठेल
ते जाडजूड पुस्तक
कधी चाळून संपेल ठाऊक नाही

चर्चा चालूच आहे अजूनही

बाबासाहेब बॅरिकेट पलीकडे

निघून गेलेत कधीचेच

रस्ता निर्जन आहे
अजून भयाण वाटतो आहे

आणि दूरवर
बाबासाहेबांची पाठमोरी आकृती
विरळ विरळ होत
दिसेनाशी होण्याच्या अलीकडे आहे

## मी एकटाच चालतोय कधीचा

मी एकटाच चालतोय कधीचा
कुणीच कसली चाहूल देत नसलेलं
हे शहर माझं नाही निर्जन रितं रिकामं
माणसं कुठे निघून गेली सारी की आहेत तरी मलाच जाणवत नाहीत
की मीच दिसत नाही त्यांना
की वेळ थांबलीये माझ्यासाठी
की गोठून उभीये भयग्रस्त

हे खरं आहे की भास मी आहे की नाही
या इमारतींना स्पर्श केल्यास जाणवतील का हातांना स्पर्श
की हात भस्सकन शिरेल आत आभासाच्या
की मीही जाऊ शकेन आरपार या इमारतींच्या

मी चालतो आहे तो रस्ता तरी खरा आहे
की सावलीच चालते आहे जी
माझीच असेल याची खात्रीही

देता येत नाहीये मला या उन्हालाही
सावलीची खात्री उरली असेल असं
वाटत नसतांना मी का फिरतो आहे या
स्मशानशांततेतून की मी म्हणजेच ती
शांतता झालोय की माझा धूर म्हणजेच
माझी सावली आहे की हा सूर्यच खोटा
ही सावली खोटी मग हे शहर का आहे
अजूनही माझ्या डोळ्यांच्या बाहुल्यांत
मी चालतो आहे मी श्वास घेतो आहे मी
जिवंत आहे असं या निर्वात पोकळीतही
का वाटतं आहे का अंतर्धान पावत नाहीये
हे भवताल का हृदयात जाणवते धडधड
का अंगावर येते आहे स्तब्धता जिची मी
वाट पाहात होतो वर्षानुवर्ष का मला
नकोशी झालीय ती का मला आठवताहेत
बुद्ध महावीर सोतो रिंझाई ryokon
का वाटतं आहे संपावं सगळं एकदाच उजळून निघावं एखादं स्वप्नं साक्षात
का अजूनही वूहान चायना अमेरिका
रशिया जपान इझ्रायल पाकिस्तान आणि
दिसताहेत जगातली सगळी माणसं
आपापला चेहरा जगण्यासाठी लपवलेली

मी एकटाच चाललोय सावलीसोबत
जी कुणाचीय मला कळेना झालंय तरी
मी चालतो आहे चालतो आहे
चालणार आहे जोवर हा रस्ता
संपत नाही किंवा मी थांबत नाही

## महारात्र

सरता न सरणारी ही
कुठली महारात्र आलीये
महानिर्वाणाआधीच्या या उत्तररात्री

कुत्री फिरताहेत निर्जन रस्त्यांवर
उंच इमारतींकडे निर्विकारपणे पाहात
मांजरी पिसाळल्यात मनातल्या मनात
खूप उंदीर मारल्याच्या आविर्भावात
रस्ते ओस उजाड भयग्रस्त पडलेले
काहीतरी भयानक होण्याच्या प्रतीक्षेत

हे कस्सलं गरम व्हायला लागलंय
हा कुठला धाराप्रवाह मानेवरून
मणक्यांमधून कुल्ल्यांच्या चिरेतून
मांड्यांवर ओघळून गुडघ्यांमागून
पोटऱ्यांवरून वाहत चाल्लाय उष्ण
माणूसपणा वितळवत रोजरोस
या संसर्गित शहराच्या गल्लीबोळांतून

ही सरता सरत नाहीये रात्र
दारू पिऊन झोपेच्या गोळ्या घेऊन
भण् भण् चालूये नुस्सती जड पापण्यांवर
कपाळापासून संपूर्ण कवटीमध्ये
अघोरी रौद्र राक्षसी अमानुष मुखवट्यांची थंडपणे दरडावत भण् भण् चालूये नुस्सती

पलीकडल्या खोलीत बायको मुलगा
फिरत असतील सतत न्यूज चॅनल्सच्या
भयावह दृश्यातून एकमेकांना बिलगून
कसलीतरी अवकृपा झाल्याच्या बेचैनीत
अधूनमधून झोपी जाण्याच्या प्रयत्नात
पांघरुणातल्या पांघरुणात पापण्यांच्या
भिरभिऱ्यांत भोवंडून जात असतील अनाथ

कधी लागणारेय शांत झोप त्यांना
कधी पडणारायत स्वप्नं त्यांना हवी ती
कुठल्याशा अदृश्य चाहुलीने अचानक
दार ठोठावल्याचा आभास न होणारी
गर्भरेशीम नीज कधी येणारेय त्यांना
माझाही भकास एकांत कधी संपणारेय

या माझ्या सुन्नं विस्तीर्णं खोलीतल्या
शेकडो पुस्तकातल्या हजारो व्यक्तिरेखा
पुस्तकापुस्तकांमधून निघून गर्दी करून
हातात व्हिस्की व्होडका रम बियर घेऊन
काय बोलताहेत कधीच्या कुणास ठाउक
मी जाऊ पाहतो त्यांच्याजवळ तर
ती सगळी गर्दी माझ्याकडे वळून
" सोशल डिस्टंसिंग प्लिज" असं ओरडून
मलाच हाकलतीये लांब तरी अजून

तीन वाजतात तेव्हा रात्र असते जिथून
पहाट दिसत असते चार पावलांवर तेव्हा
पाचपासून पक्षांचा एवढा चिवचिवाट जणू
माझंच बहिरेपण निघून गेलेलं अकस्मात
डोळ्यांदेखत हळूहळू उजळत गेलं झाड
बाल्कनी पुढल्या फांदीवरल्या हिरवेपणात
पहिल्यांदाच दिसताहेत कितीतरी पोपट
पानापानांतून भुर्र्रकन उडून जाताना

समुद्राच्या किनाऱ्यावर डॉल्फिन उसळताहेत म्हणे निर्धास्तपणे
नद्यानद्यांमध्ये आभाळ पडलंय निळंशार
रस्त्यांवर काही नील गाई फिरताहेत निवांत
हरणं दुडदुडताहेत रस्त्यांवरून बिनघोर मोर उतरलेत पावसाळा नसताना कुठे कुठे
गरुड उडताहेत
विमानांच्या धावपट्ट्यांवरून बेफिकीरपणे
आभाळाचं मोजमाप काढत वाऱ्यासोबत

हे काय पाहाणं आलंय

अखंड मानवजातीच्या नशीबी
उंच उंच पिंजऱ्यांमधून
या आजारी शहरात
रस्त्यारस्त्यांवर उतरल्या सर्व पशुपक्षांनो
तुम्हाला तुमची
जंगलं मिळो आभाळ मिळो चारा मिळो
कुठल्याश्या अदृश्य विषाणूमुळे
भयकंपित झालेले
आमचे श्वास तुम्हाला कळो

आणि तुमच्या निर्भयी मोकळ्या
आकाशी पंखांपाशी आम्हाला
आमची गाढ गहिरी झोप मिळो.